*मुख्य संपादक: स्नेहल वरेकर*

*संपादक मंडळ:*
नालंदा घाटगे
सतीशकुमार पडोळकर
सैफली सनदे
किरण गाढवे

मुखपृष्ठ संकल्पना: नालंदा घाटगे
मलपृष्ठ: सत्यजित वरेकर

*संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता:*
३०३ बालाजी हाईट्स, टेल्को कॉलोनी, आंबेगाव (बुद्रुक) पुणे
पिनकोड: ४११०४६
ईमेल: democraticpost19@gmail.com

* या मासिकातील लेखात व्यक्त करण्यात आलेली मते संबंधित लेखकांची आहेत. त्या मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असेलच असे नाही. सर्वाधिकार सुरक्षित. द डेमपोस्ट

* फक्त खाजगी वितरणासाठी
वर्गणीसाठी संपर्क:
नालंदा: ९९२३८०१२२१
अंकासाठी संपर्क:
कुमार: ९८६०८०९४९२
मूल्य: ३० रुपये

# अनुक्रमणिका

संपादकीय ... ३

नागरिक कोण आणि नागरिकत्व कोणाला? ... ५
- स्नेहल वरेकर, सतीशकुमार पडोळकर

शिक्षणाच्या कत्तलीचा जाहीरनामा ...१२
- रमेश बिजेकर

भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास: वास्तव की भास ...२१
- सोमनाथ काळे

बलात्कारामागील मानसिकता ...२५
- मोहिनी जाधव

अखेर विद्यार्थी का संतापले? ... २८
- सतीशकुमार पडोळकर

परिवर्तनाच्या दिशेने... ... ३२
- सोमनाथ आदमिले

द्रष्टेनेते बाप्पुजी साळुंखे ... ३५
- डॉ एस वाय होनगेकर

सेक्स आणि विलास सारंग ... ३७
- राहूल ससाणे

रंग-प्रसंग: गोडसे गांधी.कॉम ... ३९
- अनुवाद: सतीशकुमार पडोळकर

मुलाखत: असगर वजाहत ... ४७
हृषीकेश पाटील ... ५०



# संपादकीय

जागतिक स्तरावर निर्वासितांचे प्रश्न एका व्यापक पातळीवर चर्चेला येत असतानाच भारतात नागिकत्व सुधारणा कायदा (एनआरसी) संमत झाला. त्यापाठोपाठ येऊ घातलेल्या प्रस्तावित राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी प्रक्रियेला देशभरातून विरोध होत आहे. विरोधाची सुरवात दिल्लीतील जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी केलल्या आंदोलनातून झाली. या राजकीय परिस्थितीत नक्की कशाचा विचार प्राध्यान्यक्रमाने पहिल्यांदा करावा आणि कोणता विषय मागे ठेवावा ही संभ्रमावस्था निर्माण झालेली आहे.

जामिया मिलिया, अलीगड मुस्लीम विद्यापीठ आणि जेएनयू विद्यापीठातील विद्यार्थ्यांवर झालेले हल्ले, दिल्ली, बेंगलोर, लखनौ यासारख्या शहरांमध्ये पोलिसांनी आंदोलकांना गुन्हेगारांप्रमाणे ताब्यात घेणे, सभांमध्ये तथ्यांची मोडतोड करुन सामान्य नागरिकांची केली जाणारी दिशाभूल, आंदोलकांना देशद्रोही ठरवून त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांना दिलेली बगल, सत्ताधारी नेत्यांची तर्कशून्य विधाने आणि मुख्य प्रवाहातील माध्यम संस्थांनी केलेले एकांगी वार्तांकन ह्या काही राष्ट्रीय स्तरावरील घटना आहेत.

या व्यतिरिक्त सामान्य माणसासमोर आंतरराष्ट्रीय प्रश्नांचा मर्यादित आकलनाबरोबरंच राज्य, जिल्हा, तालुका ते गावपातळीवरील आजुबाजूचे आपल्या दैनिक जीवनावर प्रत्यक्षात परिणाम पाडणारे विषय आहेत. त्यांचा थेट संबंध आपल्या वैयक्तिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक जीवनाशी आहे. वर्तमान परिस्थितीत या सर्वांविषयी माहिती ठेवणे, त्याविषयी जागरूक असणे आणि आपले दैनंदिन आयुष्यातले प्रश्नही सोडविणे असे तिहेरी आव्हान आपल्यासमोर आहे.

आज भारत जगात सर्वाधिक तरुणांचा देश आहे. तरुणांची, शिक्षण घेणाऱ्यांची, काम करू शकणाऱ्यांची, देशाच्या विकासात भर घालू शकणाऱ्यांची संख्या सर्वात मोठी आहे. या उपलब्ध संसाधनांचा उपयोग करून देशाला प्रगतीच्या दिशेने नेता येण्याची सकारात्मक शक्यता इथल्या सर्वाधिक तरुण लोकसंख्येची जमेची बाजू आहे. याउलट एवढ्या मोठ्या तरुणाईला काम देणे, त्यांना देशाच्या आर्थिक विकासात सामावून घेणे, त्यांना त्यांच्या प्रतिभेनुसार रोजगार देणे ही आव्हाने आहेत. यांच्या हाताला काम न देऊ शकल्यास हीच तरुणाई देशासाठी ओझे ठरू शकते. वाढती बेरोजगारी आणि अकार्यक्षम शिक्षणव्यवस्था देशातील सद्यस्थितीला कारणीभूत आहेत. मागे वळून जरा इतिहासावर नजर टाकली तर कळते की बेरोजगार जनता आक्रमक थापांच्या प्रचारतंत्राला बळी पडते.

आकडेवारीनुसार देशात काम करता येऊ शकणारांची लोकसंख्या काम न करु शकणाऱ्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. कार्यक्षम लोकसंख्येवर अवलंबून असलेल्या संख्या मात्र कमी झालेली नाही. काम करु शकणारे देशाच्या उत्पन्नात भर घालून अर्थव्यवस्थेला चालना देऊ शकतात या स्थितीला डेमोग्राफिक डिविडंट म्हणजेच लोकसंख्या लाभांश

उंचावणे व सशक्तीकरण करण्याचा प्रस्ताव ठेवलेला आहे. त्यासाठी शिक्षिकांची नियुक्ती, मातृत्व लाभ योजना, शिषू केंद्र, नेतृत्व विकास (रा.शि.नि.अ.८ पा.२०३) शाळेत स्वतंत्र शौचालय, वाहतूक सुविधा, सायकल (रा.शि.नि.अ.६पा.२०४) इत्यादी सोयींची पूर्तता करण्याचे सूचवलेले आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांना स्त्रियांचा आदर करायला शिकविले जाणार आहे. अशा यांत्रिक व भंपक उपाययोजनेतून स्त्री-पुरुष समानता शिक्षण व्यवस्थेत येणार नाही. पुरुषसत्ताक व्यवस्थेला आव्हान उभे करुन स्त्री-पूरुष समानतेची शालेय रचना व आशय उभा केल्याशिवाय स्त्रियांचा शिक्षणाचा सहभाग शाश्वत होत नाही. ज्याची स्पष्ट हमी हा मसुदा देत नाही.

शिक्षणाचे स्तरीकरण:

भारतातील जाती रचनेने समाजात टोकाचे स्तरीकरण अस्तित्वात आणले. जाती उतरंडीतून वेगवेगळे सामाजिक आर्थिक स्तर अस्तित्वात आले. याचे प्रतिबिंब शालेय रचनेमध्ये पाहायला मिळते. सरकारी व खाजगी दोन्ही प्रकारच्या शाळांमध्ये हे स्तरीकरण अस्तित्वात आहे. केंद्र शाळा, नवोदय विद्यालय, सैनिकी शाळा इत्यादी केंद्र स्तरावर आणि जिल्हा परिषद, महानगरपालिका, खाजगी अनुदानित आश्रम शाळा अशा ७० प्रकारचे शाळांचे स्तरीकरण अस्तित्वात आहे. ज्या सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीतून विद्यार्थी असेल त्या-त्या स्तरावरील शाळा उपलबद्ध आहेत. म्हणजे प्रवेशपात्र विद्यार्थ्यांना विविध स्तरावर विभागले जाते. यातून मुळातच त्यांना समान स्तर व समान संधी डावलली जाते. विविध शिक्षण हक्क कायदे हे स्तरीकरण संपवू शकलेले नाहीत. कारण स्तरीकारणावर कोणतीही बंधने शिक्षण हक्क कायदयाने आणलेली नाहीत.

ही स्थिती बदलणे गरजेचे होते. त्यासाठी समान शाळा पद्धती अस्तित्वात आणण्याची भूमिका घेणे गरजेचे होते. परंतू 'राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०१९' ने याउलट भूमिका घेतलेली आहे. आहे त्या शाळांचे स्तरीकरण कायम ठेवून त्यात नव्याने वाढ केलेली आहे. शाळाबाहय असलेल्या कुमारावस्था मुलांसाठी 'ब्रिज प्रोग्राम' (रा.शि.नि.पा.९३), स्थलांतरित विद्यार्थ्यांसाठी औपचारिक, अनौपचारिक पर्याय (रा.शि.नि.अ.३.पा ), वंचित मुलांसाठी ओपन स्कूलिंग (रा.शि.नि.अ.३.पा.९४), १५ वर्षापेक्षा अधिक वयाच्या मुलांसाठी प्रौढ साक्षरता कार्यक्रम (रा.पि.नि.अ.३.पा.९३), गुरुकुल, पाठशाला, मदरसा, होम-स्कुलींग इत्यादी पर्यायांचा शिक्षण हक्क कायदयाच्या चौकटीत आणण्याचा प्रस्ताव दिलेला आहे. (रा.शि.नि.अ.पा.९५, ९६) अशाप्रकारे शिक्षण हक्क कायदयाची चौकट बळकट करुन स्तरीकरणात वाढ होईल.

समांतर नियुक्त्या:

स्वंयसेवक, सामाजिक कार्यकर्ता व इन्स्ट्रक्टर या तीन पदांची पूर्व प्राथमिक ते बारावी पर्यंत नियुक्ती केली जाणार आहे. या नियुक्तीची गरज व निकष काय असतील या प्रश्नांची उत्तरे स्पष्ट नाहीत, परंतू हे काय काम करणार याची स्पष्टता जरूर आहे. अध्यापनात मदत, पालक सभेत सहभाग, पालकांच्या भेटी, सांस्कृतिक व इतर कार्यक्रमाच्या आयोजनात सहभाग, विद्यार्थ्यांचे अतिरिक्त वर्ग घेणे, मिटींगाचे आयोजन, शाळाविकास आराखडा तयार करणे, विकास आराखडयाचा रिपोर्ट तयार करुन तो पाठवणे इत्यादी कामे हे करणार आहेत. यांच्या कामाची चौकट निश्चित केलेली आहे. परंतू अधिकाराची चौकट गुलदरत्यात ठेवण्यात आलेली आहे. अधिकाराची चौकट गुलदस्त्यात असल्यामुळे अमर्याद चौकटीचा वापर करण्याचा अवकाश निर्माण केलेला आहे. यांच्या नियुक्तीचे निकश स्पष्ट नसल्यामुळे सरकार ज्या विचाराचे असेल त्या विचारसरणीचे लोक नियुक्त केले जातील हे उघड आहे.

एकंदरीत प्रचलित शिक्षण व्यवस्थेची जातवर्गीय लिंगभाव शिक्षण रचना व आशयाचे बळकटीकरण, शिक्षणाचे स्तरीकरण, निर्णयाच्या केंद्रीकरणाला राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९ बळकटी आणते.

(लेखक हे सत्यशोधक शिक्षक सभेचे अध्यक्ष आहेत तसेच अ.भा. शि.अ. म.सदस्य आहेत)

संपर्क: ९६६५०५४३४५



# भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास: वास्तव की भास

*डॉ सोमनाथ काळे*

*भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील सर्वात मोठ्या पाच अर्थव्यवस्थामधील एक असली तरी चालू आर्थिक वर्षात जीडीपी वाढीच्या दरातील निचांक, वाहनउदयोग क्षेत्रात सातत्याने होणारी घसरण व त्यामुळे लक्षणीय प्रमाणात होणारी रोजगार कपात, चलनवाढीचा दर अपेक्षित पातळीवर रोखण्यात आलेले अपयश या बाबी चिंतेचा विषय आहे. त्यामुळे मौद्रिक धोरण प्रभावीपणे राबवण्यासाठी मध्यवर्ती बँकेला असलेली स्वायत्तता अबाधित ठेवणे किंबहुना अधिक स्वायत्तता प्रदान करणे, अधिक रोजगार निर्मितीक्षम उदयोगांमध्ये सार्वजनिक खर्चाचे प्रमाण वाढवणे तसेच भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजल्या जाणाऱ्या कृषी क्षेत्राच्या विकासाकडे विशेष लक्ष पुरविणे आणि देशाची अर्थव्यवस्था आर्थिकदृष्ट्या अधिकाधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे.*

मानव हा स्वभावत: विकासशील प्राणी आहे. सातत्याने नावीन्याचा शोध घेत राहणे ही मानवाची सहजप्रवृत्ती आहे. आपल्या सातत्याने निर्माण होत असलेल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी सतत आवश्यक व नावीन्यपूर्ण वस्तूंची निर्मिती करणे याचा संबंध विकासाच्या प्रक्रियेशी आहे. मानवाचा जसजसा विकास होत गेला तशा समाज, देश या संकल्पना अस्तित्वात आल्या, कालांतराने त्या विकसित होत राहील्या व 'आर्थिक विकास' या संकल्पनेला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले. मानवाच्या प्रगतीबरोबरच आर्थिक विकास, आर्थिक वृद्धी या संकल्पनांचा परीघ विस्तारत गेला. या आर्थिक विकास, आर्थिक वृद्धी यांच्या स्वरूपानुसार विकसित देश, विकसनशील व मागासलेले देश अशी जगाची विभागणी केली गेली. आज जागतिक पातळीवर कोणत्याही देशाचा दर्जा हा त्याचा आर्थिक विकासाचा दर विचारात घेऊन ठरविला जातो. आणि कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाचा मापदंड म्हणून त्या देशाचे स्थूल देशांतर्गत उत्पन्न (जीडीपी) वाढीचा दर विचारात घेतला जातो.

*विकासाचा निर्देशक : स्थूल देशांतर्गत उत्पन्न (जीडीपी) संकल्पना व अर्थ*

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाचे मोजमाप करण्यासाठी वापरला जाणारा मापदंड म्हणजे त्या देशाचे स्थूल देशांतर्गत उत्पन्न(जीडीपी) होय. राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या अनेकविध पद्धती आहेत त्यामध्ये सर्रास वापरली जाणारी पद्धत म्हणजे जीडीपी होय.


"विशिष्ट कालावधीत (एक वर्ष) देशाच्या राजकीय व भौगोलिक सीमेच्या आत उत्पादन केलेल्या अंतिम वस्तू (ज्या वस्तूंचा उपभोग घेतल्यानंतर त्या संपुष्टात येतात) व सेवांचे पैशातील मूल्य म्हणजे स्थूल

देशांतर्गत उत्पादन असे संबोधले जाते." जीडीपीमध्ये उपभोग, सरकारी अथवा सार्वजनिक खर्च, गुंतवणूक व निव्वळ निर्यात इ. चा विचार केला जातो. देशाचा जीडीपी मोजण्यासाठी खालील सूत्र वापरले जाते.

स्थूल देशातर्गत उत्पादन = उपभोग + सार्वजनिक खर्च + गुंतवणूक + निव्वळ निर्यात

निव्वळ निर्यात म्हणजे देशाने एका वर्षात निर्यात केलेल्या एकूण वस्तू व सेवांच्या निर्यातीपासून मिळणाऱ्या उत्पन्नातून त्याच वर्षातील आयातीचे मूल्य वजा करून शिल्लक राहिलेली रक्कम होय.

जीडीपीचे वास्तव व नाममात्र जीडीपी या दोन पद्धतीने मापन केले जाते. एखाद्या देशाचा वास्तव जीडीपी म्हणजे त्या देशात एका वर्षाच्या कालावधीत उत्पादन केलेल्या एकूण वस्तू व सेवांचे मूल्य स्थिर किमतीनुसार (आधारभूत वर्षातील कीमती - आधारभूत वर्ष म्हणजे ज्या वर्षात देशातील किमत पातळीत खूप मोठे बदल न होता सर्वसाधारण पातळीवर स्थिर असते) मोजले जाते. नाममात्र जीडीपी मध्ये, संबंधीत वर्षातील चालू अथवा बाजार किमतीनुसार देशात उत्पादन केलेल्या वस्तू व सेवांचे मूल्य विचारात घेतले जाते.



जागतिक जीडीपी म्हणजे जगातील सर्व देशांच्या राष्ट्रीय उत्प[illegible]ी बेरीज असते. जागतिक अर्थव्यवस्थेत संयुक्त अमेरिकन संस्थाने या मोठ्या अर्थव्यवस्थेबरोबरच एकूण १९३ देशांचा समावेश होतो. जागतिक बँकेच्या अहवालानुसार सन २०१७ मध्ये जागतिक अर्थव्यवस्थेचे नाममात्र उत्पन्न $८०६८३ द.ल. होते तर २०१८ मध्ये ते $८४८३५ द.ल. व २०१९ मध्ये ते $८८०८१ द.ल. होईल असा अंदाज जागतिक बँकेने व्यक्त केला आहे. आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये जागतिक जी.डी.पी. वाढीचा दर ३.६% राहील असा अंदाज आहे. जगामध्ये अनेक देशांची वेगवेगळी चलने प्रचलित आहेत. जगभरातील देशांच्या जीडीपीची तुलना करण्यासाठी त्यांची चलने परिवर्तनीय असणे आवश्यक आहे. जेणेकरून ती सर्व देशांमध्ये सुसंगत असतील.


*भारतीय अर्थव्यवस्था: दृष्टीक्षेप व जागतिक स्थान*

भारतीय अर्थव्यवस्था ही विकसनशील अर्थव्यवस्था असली तरी नाममात्र जीडीपी नुसार जागतिक क्रमवारीत ती पाचव्या स्थानावर असून क्रयशक्ती क्षमतेनुसार ती तिसऱ्या क्रमांकावर आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालानुसार नाममात्र दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत १४२ व्या तर खरेदी क्षमतेनुसार ती ११९ व्या स्थानावर आहे. यावरून आपल्याला आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचे जागतिक पातळीवर असलेले स्थान लक्षात येते. म्हणजेच दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत जागतिक पातळीवर भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती फारशी समाधानकारक नसल्याचे दिसून येते.

भारतीय अर्थव्यवस्थेत नियोजनाच्या सुरुवातीपासून ते २०१८-२०१९ पर्यंत अर्थव्यवस्थेच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर स्थिर किमतीनुसार ३.१% ते ९.८% व चालू किमतीनुसार ६.४% ते १९.६% यांदरम्यान राहिला आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक वाढीचा दर हा ६.८% इतका राहिला असून चालू आर्थिक वर्षात तो ६.१% राहील असा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यक्त केला आहे. जगातील १९३ देशांच्या यादीत भारतीय अर्थव्यवस्था ८ व्या स्थानावर आहे. मागील



आर्थिक वर्षातील भारताच्या जीडीपीचे मूल्य विचारा[illegible]घेतले तर स्थिर किमतीनुसार (आधार वर्षातील किमत) जीडीपीचे मूल्य रु.२.९३६ अब्ज तर बाजार किमतीनुसार रु.११. ३२६ अब्ज इतके आहे. जीडीपी मूल्याच्या बाबतीत परिस्थिती काहीशी समाधानकारक दिसत असली तरी जीडीपी वाढीच्या दराचा विचार करता ती निराशाजनक आहे असे म्हणता येईल. कारण २०१७-१८ मध्ये जीडीपी वाढीचा दर ७.२% होता, २०१८-१९ मध्ये ६.८% तर २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत तो ४.५% पर्यंत घसरला आहे. सन २०१७-१८ मध्ये दरडोई-जी.डी.पी. रुपये १,००,१५१ तर २०१८-१९ मध्ये ते रुपये १,०५,६८८ इतके होऊन त्यात वाढ झाल्याचे दिसत असले तरी दरडोई उत्पन्न वाढीचा दर मात्र ५.८% वरून ५.५% इतका कमी झाला आहे. जीडीपीमधील क्षेत्रनिहाय हिस्सा विचारात घेतला तर त्यामध्ये खूपच असमानता असल्याचे दिसते. भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान आहे परंतु जीडीपीमधील या क्षेत्राचा हिस्सा १५.४%, औद्योगिक क्षेत्राचा २३% तर सेवा क्षेत्राचा हिस्सा ६१.५% इतका आहे. तसेच २०१६-१७ मध्ये शेती व संबंधीत क्षेत्राच्या विकासाचा दर ६.३% वरून २०१८-१९ मध्ये २.९% इतका घसरला आहे. यावरून देशाच्या आर्थिक विकासाची भिस्त ज्या क्षेत्रावर अवलंबून आहे अशा कृषी क्षेत्राचा हिस्सा खूपच कमी असल्याचे दिसून येते. मात्र दुसऱ्या बाजूला देशाच्या कृषी क्षेत्रामधील रोजगाराचे प्रमाण ५०% हून अधिक आहे. हे चित्र फारसे आशादायी नाही. अर्थव्यवस्थेचा आणखी सखोल अभ्यास केल्यास जीडीपी मधील कौटुंबिक अथवा घरगुती उपभोग क्षेत्राचा हिस्सा ५९.१%, सार्वजनिक किंवा सरकारी उपभोग क्षेत्राचा हिस्सा ११.५%, स्थिर भांडवल क्षेत्रातील गुंतवणूक २८.५%, यादीमधील गुंतवणूक ३.९% तर वस्तू आणि सेवा यांच्या निर्यातीपासून मिळणारे उत्पन्न १९.१% इतके आहे. येथे निर्यातीपासून मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये वाढ होणे आवश्यक आहे.




सन २०१७-१८ मध्ये अर्थव्यवस्थेतील घाऊक किंमत वाढीचा दर ३% होता तो २०१८-१९ या आर्थिक वर्षात ४.३% इतका झाला. सन २०१८ मध्ये मानव विकास निर्देशांकाच्या बाबतीत भारत जागतिक क्रमवारीत १२९व्या क्रमांकावर असून त्याचे HDI मूल्य ०.६४७ इतके आहे. सन २०१५-१६ मध्ये भारतातील बेरोजगारीचा दर ६% राहीला त्यामध्ये ग्रामीण बेरोजगारी ५.३% आहे व शहरी बेरोजगारीचा दर ७.७% इतका आहे. तसेच दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण २१.९% इतके आहे. सन २०१९ मध्ये प्रत्यक्ष रोजगार प्रवाहात असलेल्या लोकांची संख्या ५१.९५ कोटी इतकी आहे. यापैकी शेती क्षेत्रामध्ये कार्यरत असलेली लोकसंख्या ४४%, औद्योगिक क्षेत्रामध्ये २५%, तर सेवा क्षेत्रामध्ये ३१% लोकसंख्या कार्यरत आहे.

भारतातून होणाऱ्या निर्यातीमध्ये सर्वाधिक वाटा वस्तुनिर्माण क्षेत्राचा असून तो ७०.५% इतका आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत सर्वात महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या शेती क्षेत्रातील निर्यात सर्वात कमी असून एकूण निर्यातीशी असलेले त्याचे प्रमाण १२.८% इतके आहे तर खाण उत्पादने व तेल संसाधनाची निर्यात १३.८% इतकी आहे. भारताच्या आयातीमध्ये सर्वाधिक वाटा उत्पादन क्षेत्राचा असून ५१.७% इतका आहे.

देशाची आर्थिक स्थिती अधोरेखित करणारा

ची एक घटक म्हणजे त्या देशाचा सार्वजनिक सार्वजनिक उत्पन्न व सार्वजनिक कर्ज होय. त आर्थिक वर्षाचा विचार केला तर आपल्या यवस्थेतील सरकारचे एकूण उत्पन्न रु.३९.२९ असून जीडीपीशी असलेले त्याचे प्रमाण २०.६०% आहे. मात्र सार्वजनिक खर्च हा उत्पन्नापेक्षा क असून तो रु. ५३.३३ द.ल. आहे व त्याचे पीशी असलेले प्रमाण २७.२८% इतके आहे. ndard and Poor' या पतमुल्यांकन करणाऱ्या ने अंतर्गत गुंतवणुकीसाठी BBB- तर परकीय णुकीसाठी BBB+ असे रेटिंग दिले आहे व णुकीसाठी स्थिर परिस्थिती असल्याचे विश्लेषण आहे. भारताकडे असलेल्या परकीय गंगाजळीचे ा नोव्हेंबर २०१९ च्या आकडेवारीनुसार ८.५९६ द.ल. इतके आहे.

जागतिक अर्थव्यवस्थेच्या जीडीपीमधील ाच्या जीडीपीचा हिस्सा विचारात घेतल्यास सन ० पासून २०१८ पर्यंत सातत्याने वाढत असून वाढ २.८९% पासून (काही वर्षांचा अपवाद ऊता) ७.७७% इतकी आहे. सार्वजनिक कर्जाचा र केल्यास, सन २००३ मध्ये सार्वजनिक कर्जाचे पीशी असलेले प्रमाण सर्वाधिक म्हणजे ८४.२% ५ प्रचंड होते. मात्र अलीकडील काही वर्षामध्ये, १ ते २०१८ या कालावधीत ते ६९.६ % वरून % पर्यंत म्हणजे नगण्य प्रमाणात कमी झाले . तसेच २०१५-१६ या वर्षातील ३.९% असलेले ारच्या राजकोषीय तुटीचे प्रमाण मागील आर्थिक त ३.४% पर्यंत कमी करण्यात यश आले आहे. र आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालानुसार ल आर्थिक वर्षात देशाच्या चालू खात्यावरील २.१ % इतकी असून चालू आर्थिक वर्षात ती २ र्यंत नगण्य प्रमाणात कमी होईल. मात्र यावरून गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे सार्वजनिक ाचे जीडीपीशी असलेले हे प्रमाण सरकारी खर्चाचा व्यय, सरकारच्या विकास धोरणास आलेले यश अधोरेखित करते.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने ऑक्टोबर,२०१९ मे प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार जागतिक पन्नातील भारतीय अर्थव्यवस्थेचा हिस्सा ७.७%, वस्तू व सेवांच्या [illegible] निर्यातीमधील हिस्सा केवळ २.२% असून जागतिक लोकसंख्या विचारात घेता त्यातील हिस्सा मात्र १७.९% इतका आहे. यावरून जागतिक पातळीवरील आपल्या देशाचे आर्थिक व व्यापार स्थितीबाबतचे स्थान लक्षात येईल.

भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील सर्वात मोठ्या पाच अर्थव्यवस्थामधील एक असली (वास्तव जीडीपीनुसार तिसऱ्या क्रमांकाची व नाममात्र जीडीपीनुसार पाचव्या क्रमांकाची) तरी चालू आर्थिक वर्षात जीडीपी वाढीच्या दरातील नीचांक, वाहन उद्योग क्षेत्रात सातत्याने होणारी घसरण व त्यामुळे लक्षणीय प्रमाणात होणारी रोजगार कपात, चलनवाढीचा दर अपेक्षित पातळीवर रोखण्यात आलेले अपयश या बाबी चिंतेचा विषय आहे. त्यामुळे मौद्रिक धोरण प्रभावीपणे राबवण्यासाठी मध्यवर्ती बँकेला असलेली स्वायत्तता अबाधित ठेवणे किंबहुना अधिक स्वायत्तता प्रदान करणे, अधिक रोजगार निर्मितीक्षम उद्योगांमध्ये सार्वजनिक खर्चाचे प्रमाण वाढवणे तसेच भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजल्या जाणाऱ्या कृषी क्षेत्राच्या विकासाकडे विशेष लक्ष पुरविणे आणि देशाची अर्थव्यवस्था आर्थिकदृष्ट्या अधिकाधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे.

संदर्भ:

1.Chand Publication, New Delhi, 'Indian Economy', Rudra Datt and K.P.M Sundaram

2.Indian Economic Survey, 2018-19.

3.http://www.indiabudget.gov.in/economic survey

4.http://www.finmin.nic.in/parenthorizontaltab2

5.Human Development Report – 2019 (UNDP)

(लेखक विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर येथे अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक आहेत)



# बलात्कारामागील मानसिकता

*मोहिनी जाधव*

*भारतातील लिंगभाव असमानतेचे आपण अगदी सहजपणे निरीक्षण करू शकतो. यासाठी आपल्याला जास्त खोलात जाण्याचीही गरज नाही. दैनंदिन जीवनात आपण स्त्री-पुरुष नात्याकडे कसे पाहतो, कसे वर्तन करतो यातच बलात्काराचे, स्त्रियांवर होणाऱ्या प्रत्येक प्रकारच्या अन्याय-अत्याचाराचे मुळ सापडते. स्त्रीबरोबर अगदी ती जन्माल्यापासून भेदभाव केला जातो. हा भेदभाव इथेच थांबत नाही तर हुंडा स्वरूपात तिला विकलेही जाते आणि उपभोग्य वस्तू म्हणून तिच्याकडे नेहमीच बघितले गेले आहे. घरात, समाजात आया-बहिणींवर सत्ता गाजवायची, भेदभाव करायचा आणि बाहेर आव आणायचा की आम्हा जिजाऊंच्या लेकींवर अन्याय व्हायला नको, अशी अपेक्षा करणारे पुरुष आपल्या समाजासाठी घातक आहेत.*

बलात्कार! पितृसत्ताक व्यवस्थेचे अत्युच्च पातळीवरील हिंसात्मक रूप... स्त्रिया ह्या नेहमीच अगदी आजपर्यंत सुद्धा पुरुषांच्या तुलनेने कायमच बंदी आणि कमी स्वातंत्र्यात वावरत आल्या आहेत. स्त्रियांच्या लैंगिकतेवर किंवा एकूणच स्त्रियांवर पुरुषांचे नियंत्रण होते आणि आजतागायत आहे. याचा मानसिकदृष्ट्या मोठा परिणाम स्त्रियांवर झाला. स्त्रिया ह्या गट, वर्ग, समूह म्हणून पुरुषी मानसिकतेने त्यांना दुय्यम ठरवले. ह्या दुय्यमत्वातून आणि शोषणातून बाहेर पडण्यासाठी स्त्रियांनी संघर्ष सुरु केला व तो संघर्ष आजही चालूच आहे. कोणत्याही लैंगिक शोषणाच्या मुळाशी शोषित घटक म्हणून नेहमी 'स्त्री'च केंद्रस्थानी असते. एकविसाव्या शतकातलं आता दुसरं दशकही संपायला आलं आहे तरी बलात्काराच्या घटना कमी होण्याच्या ऐवजी दिवसेंदिवस वाढतच चालल्या आहेत.

गेल्या महिन्यात डॉ. प्रियांका रेड्डी यांच्यावरील झालेला बलात्कार व खून ही घटना समोर आली की लागोलाग झारखंड राज्यातील लॉ करणाऱ्या एका आदिवासी मुलीवर झालेल्या बलात्काराची घटना ताजी होती की उन्नाव मधील पीडित तरुणीवर त्याच आरोपीने केलेला हल्ला आणि जिवंत जाळण्याची घटना घडली. ह्या सर्व बातम्या कानावर अक्षरशः आदळत होत्या तोच औरंगाबाद मधील एका नराधमाने गेल्या तीन महिन्यांपासून स्वतःच्या आईलाच आपल्या वासनेची शिकार बनवल्याची बातमी आली. आपल्या समाजात 'पर-स्त्री मातेसमान' ही रीत म्हणवली जाते अन इथे त्या मातेला स्वतःच्याच मुलाकडून असे पाशवी अत्याचार सहन करावे लागत आहेत. वरचेवर घडणाऱ्या ह्या घटनांमुळे लोकांना त्याचे गांभीर्य तर वाटतच नाही